## झरोका

एक – विधानसभा निवडणूकीचे वारे वाहत आहे. काँग्रेसच्या जाहीरनामा समितीचे प्रमूख म्हणून माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची नियूक्ती करण्यात आली आहे. परंतू उद्याचे भावी मुख्यमंत्री असा अविर्णवात असलेले माजी मंत्री, आ. अमित देशमूख यांचे सदस्य म्हणूनही जाहीरनामा समितीत नांव नाही म्हणून दु:ख वाटते आहे कांहीच कळत नाही. डोकं बधीर झालयं.

दुसरा – अरे, पृथ्वीराज चव्हाण तत्कालीन पंतप्रधान कार्यालयाचे केंद्रीय राज्य मंत्री राहीलेले आहेत. त्यांची बरोबरी अमित देशमूख करुच शकत नाहीत उलट स्वत: निवडणूकीतील उमेदवार म्हणून आर्जीव करु पाहाणारे आ. अमित देशमूख जाहीरनामा समितीत असूच कसे असतात नाहक वाद निर्माण कशाला करतोस.

एक – अहो, आपल्यासाठी आ. अमित देशमूख हेच महत्वाचे आहेत. त्या पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात, शरद पवार वगैरेना चाटायचे आहे काय म्हणून बोलतोय.

दुसरा – अरे, तूला आ. अमित देशमूख जवळचे, हक्काचे वाटतात पण तेच तूला जूमानत नाहीत. अस्पृश्य, बिनकामी समजतात त्याचे काय.

एक – अहो, ते लोकप्रतिनिधी आहेत. ते कोणा–कोणाकडे पाहतील पण आपणच आ. अमित देशमूख यांचेकडे विलासराव म्हणतात त्या प्रमाणे घार फिरे आकाशी, चित्त तिचे पिलापासी, म्हटल्याप्रमाणे लक्ष दिले पाहीजे समजलं.

दुसरा – अरे, लातूर शहर विधानसभा मतदार संघात नव्या चेहऱ्यासह एका जेष्ठ पूढाऱ्याच्या मुलीचे नांवे चर्चेत असल्याने अमित भैय्याचे भविष्य टांगणीवर असल्याचे बोलले जाते आहे, त्याचे काय ते कळत नाही, पाहू.

## काय बोलता राव ?

ओबीसी कोट्यातून मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देवून आरक्षण मिळणारच नाही. जरांगे पाटील हे चूकीचे आंदोलन करीत आहेत. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस हे ओबीसीच्या बाजूने आहेत. मराठा समाजाचे नेते नव्हेत.

**काय बोलता राव,**

अरे, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ओबीसीचेच आहेत. महाराष्ट्रातील मंत्री छगन भूजबळ ओबीसीचे आहेत. काँग्रेससह शरद पवार ही ओबीसी बद्दल अनुकूल आहेत. त्यात ओबीसीसाठी स्वतंत्र मंत्रालय कक्ष, देवेंद्र फडणवीस यानीच निर्माण केला आहे. मागासवर्ग आयोगाला संवैधानिक दर्जा फडणवीस यानीच दिला. विशेष वस्तीगृहे निर्माण केली. त्यामूळे ओबसी वर्ग म्हणजे कांही धर्मशाळा नव्हे, कोणाला ही आधार द्यायला असे आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यानीच स्पष्ट केल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यानी मराठा आरक्षण देणारच हे वचन, शब्द निष्क्रिय ठरतात हेच स्पष्ट होते असे सूतोवाच पंजाब मधील ओबीसी समाजाच्या अधिवेशनातून प्रकट झाले, देवेंद्र फडणवीस यांच्या अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यात आला मग ओला दाजीबा !

# सावधान, प्रकाश आंबेडकर बोलताहेत !

## संपादकीय...

भारतीय रिपब्लिकन पक्ष, बहूजन महासंघाचे नेते तथा आजचे वंचित बहूजन आघाडीचे प्रमूख ॲड. प्रकाश आंबेडकर हे अभ्यासू, वैचारिक दृष्टीकोणातून समाज परिवर्तनाची लढाई करणारे नेते आहेत. ते भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, आधूनिक भारताचे महानायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू असले तरी ॲड. प्रकाश आंबेडकर हे स्वत:चा ठसा उमटवू पाहाणारे जागरुक नेते ठरावेत अशी त्यांची छबी आहे हे विसरता कामा नये.

मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नांव देण्यासाठीच्या दलित पँथरच्या आंदोलनाची गरज नाही असे रा.सू. गवईच्या सूरात सूर मिळवून वातावरण बिघडविणारे कांही नेते होते. ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी पँथरमधीलच कार्यकर्त्यांच्या आधारावर भारीप, बहूजन महासंघ स्थापन केला त्यानंतर प्राध्यापक, वकीलाचा भरणा झाला पण कोणी ही टीकले नाही. म्हणून आजघडीला वंचित बहूजन आघाडीच्या नावावर समतेचे, जाती निर्मूलनाचे कार्य करु पाहाणारे ॲड. प्रकाश आंबेडकर यांची कृती, वृती भाजपालाच पूरक ठरु शकते अशी लोकप्रतिक्रिया व्यक्त होत असली तरी मराठा, ओबीसी आरक्षणासंदर्भात आरक्षण बचाव यात्रा काढून ओबीसीना साथ देण्याचे ॲड. आंबेडकरांचे प्रयत्न कौतूकास्पद ठरावेत असे म्हटल्यास वावगे ठरु नये.

मागील लोकसभा निवडणूकीपूर्वी ॲड. प्रकाश आंबेडकर यानी शिवसेना, उध्दव ठाकरे सोबत यूती केली होती पण तीत काळे मांजर आडवे आले आणी महाविकास आघाडीचा घटक पक्ष बनून लोकसभा निवडणूकीसंदर्भात अव्या, सव्या जागेच्या मागणीमूळे आघाडी बिनसली, सवतासुभा जाहीर झाला आणी मग वंचित ते वंचितच राहून ॲड. प्रकाश आंबेडकर यानी ऐन विधानसभा निवडणूकीच्या तोंडावर ओबीसी आरक्षण बचाव यात्रा काढून ते अस्तित्व टीकवू पाहात असले तरी त्यांचे ध्येय, धोरण न्यायीक ठरावे, असावे म्हटल्यास वावगे ठरु नये अशीच राजकीय वर्तूळात कुजबूज होताना दिसते आहे.

ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणतात की, विधानसभा, लोकसभामध्ये प्रतिनिधीत्व करणारे गरीब मराठा नाहीतच. मराठा जात ही निजामी मराठे आणी रयत मराठे असा भेद असल्याने खऱ्या मराठ्याना न्याय मिळत नाही. परंतू मराठा आरक्षणाचा जो वाद आहे त्यात तथ्य नसून ओबीसीमधून त्याना आरक्षण मिळूच शकत नाही आणी ते निजामी मराठे आरक्षण मिळू देणारच नाहीत असे स्पष्टीकरण ॲड. प्रकाश आंबेडकर यानी केल्याने ओबीसी, मराठा आरक्षणच कोंडी, कैंचीत अडकते की काय अशीच संभ्रम अवस्था ॲड. प्रकाश आंबेडकर याच्या छत्रपती संभाजीनगर येथील ओबीसी आरक्षण बचाव यात्रेच्या समारोपातील वक्तव्यातून स्पष्ट होते आहे.

वास्तविक पाहाता मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षणाचा वाद हा केवळ राजकीय बनला असून तो विधानसभा निवडणूकीपूर्वी निकाली निघूच शकत नाही. त्यामूळे शिंदे, फडणवीस, पवार सरकार, महाविकास आघाडीचे नेते, जरांगे पाटील, ॲड. प्रकाश आंबेडकर वगैरेची चापलूसी अनाठाई ठरावी अशीच राजकीय वर्तूळातील नेत्यासह सर्वसामान्य जनतेची भावना प्रकट होताना दिसते आहे.

# धामण पाळा अन् धान्योत्पादन वाढवा (नागपंचमी विशेष)

एका शेतकऱ्याच्या नांगराच्या फाळाने नागिणीची तीन पिल्ले मृत्युमुखी पडली व त्यामुळे नागदेवतेचा कोप झाला अशीही समजूत प्रचलित आहे आणि तो वास्तववादी आहे. त्यामुळे या दिवशी शेतकरी आपल्या शेतात नांगरत नाही. कोणीही खणत नाही, घरी कोणीही भाज्या चिरायच्या नाही, तवा वापरायचा नाही व कुटायचे नाही असे काही नियमाचे पालन करण्याची प्रथा आहे. श्रद्धाळू माणसे नागदेवतेची पूजा करून तिला दूध–लाह्यांचा व गव्हाच्या खिरीचा नैवेद्य दाखवतात व आमचे संरक्षण कर अशी प्रार्थना करतात. अनंत (म्हणजेच शेष), वासुकी, पद्मनाभ, कम्बल, शंखपाल, धृतराष्ट्र, तक्षक आणि कालिया या ८ नागांची या दिवशी पूजा केली जाते. मात्र खालील श्र्लोकात वासुकी, तक्षक, कालिय, मणिभद्रक, ऐरावत, धृतराष्ट्र, कार्कोटक आणि धनंजय, असे वेगळेच नाग सांगितले आहेत.

वासुकिः तक्षकश्र्चैव कालियो मणि भद्रकः।
ऐरावतो धृतराष्ट्रः कार्कोटक धनञ्जयौ।।

भारतीय संस्कृतीत अनेक प्रकारे नागांची पूजा केली जाते. नाग म्हणजे फणाधारी सर्प, याच्या फणेवर पुढच्या बाजूने दहाच्या अंका सारखे चिन्ह असते. नागाचा रंग हिरवट किंवा पिवळा असतो. त्याच्या तोंडात विष धारण करणारे दात असतात. नागाची जीभ दुभंगलेली असते. प्राचीन भारतीय लोकांनी त्याला देवत्व देऊन त्याला पूजा विषय बनवले. कृषी संस्कृतीत नागाच्या पूजनाचे महत्त्व विशेष आहे. नाग आणि साप हे शेताचे रक्षणकर्ते आणि शेतकरी बांधवांचा मित्र मानला जातो. या सणाच्या निमित्ताने विवाहित बहिणीला तिचा भाऊ माहेरी घेऊन येतो अशी पद्धत भारतात रूढ आहे. नागपंचमीला स्त्रिया व मुली झाडाला दोरे बांधून गाणे म्हणत झोके घेतात. पूजेला जाण्यासाठी हाताला मेहंदी लावण्याची पद्धतही हौसेचा भाग म्हणून आलेली दिसते.

पूर्वी नागपंचमीच्या सणापूर्वी ८ ते १० दिवस आधी गल्लीतील सर्व लहान थोर स्त्रिया एकत्र येऊन फेर धरून गाणी म्हणायच्या. झिम्मा–फुगडी, घोडा–चुईफुई, पिंगा–काटवटकाना, पिंगा इत्यादी खेळ मनसोक्त खेळायच्या. खेळता–खेळता उखाणे, गाणी म्हणून मनमोकळं करायच्या. आजही पध्दत ग्रामीण भागात जास्त प्रचलित आहे. त्यामुळे नागपंचमीला जास्त महत्व दिल्या जाते. दहन घाटावरती रात्रभर भजने होत असतात. या दिवशी महिला वर्तुळाकार आकार तयार करून झिम्मा–फुगडी सारखी नृत्ये व खेळ खेळतात. नारळ आणि लिंबू यांच्या या दिवशी शर्थी लावल्या जातात. म्हणजे विशिष्ट अंतरावर नारळे ठेवून त्यांच्या पलिकडे फेकण्याची शर्थ फार जुनी परंपरा आहे.

या दिवशी महिला घराची स्वच्छता करतात, जमिनी शेणाने सारवितात, अंगणात रांगोळी काढतात, नागाची चित्रे भिंतीवर काढतात आणि त्याची पूजा करतात. काही ठिकाणी नागाच्या वारुळापाशी महिला गाणी म्हणत जातात आणि वारुळाची पूजा करतात. भारताच्या काही प्रांतात नागपंचमीला जिवंत नागाची पूजा होते. दूध–लाहया ह्या माणसाच्या आवडीच्या गोष्टी नागांना दिल्या जातात, पण ते त्यांचे अन्न नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. पावसाळ्यात तो माणसाच्या हिताचा आहार आहे. नागाच्या मंदिरात त्या दिवशी बाऱ्या सामुहिकरित्या म्हटल्या जातात. त्यामुळे एखाद्याला दंश झाला की त्या बाऱ्या म्हटल्याने विष सहज उतरते आणि जीव वाचला जातो.

शिराळ्याची नागपंचमी पूर्वी देशातच नव्हे तर परदेशांत ही प्रसिद्ध होती. नागपंचमीसाठी पूर्वी लाख भर लोक जमायचे. परंतु, सापांचे होणारे हाल पाहून येथील निसर्ग व वन्यजीव प्रेमींनी थेट मुंबई हायकोर्टात धाव घेतली. कोर्टाने वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार २००२ मध्ये आदेश देऊन सापांना पकडणे, त्यांचा खेळकरणे तसेच मिरवणूक काढणे, प्रदर्शन करणे, त्यांच्या स्पर्धा भरवणे यांना शासनाने बंदी केली. तसेच या आदेशाचे तंतोतंत पालन करण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासन, जिल्हाकोर्ट, वन खाते आणि पोलिसांवर सोपविली. त्यामुळे रस्तो रस्ती सापांचे खेळ दाखविणे बंद करण्यात आहे नाहीतर नागपंचमीच्या आठवडयापासुन हे खेळ मोठमोठ्या शहरात बिनादिक्कत सुरु राहायचे. त्यामुळे काही वर्षांपासून बत्तीस शिराळ्यात फक्त प्रतिकात्मक मिरवणूक काढली जाते. आजचे नागपंचमीचे व्रत नाग प्रदेशातील एका तरी व्यक्तीशी संपर्क निर्माण करून करता येईल. दात काढलेल्या आणि उपाशी ठेवून टोपलीतून आणलेल्या नागांचा छळ थांबविणे. नाग, सापांची उपयुक्तता घरोघरी, शाळा, महाविद्यालये यांच्या मध्ये जाऊन सांगितली पाहिजे. नागांमुळे उंदरांच्या संख्येवर नियंत्रण राहते. हरितक्रांतीची मनीषा पूर्ण व्हायची तर उंदरांच्या पोटात जाणारे धान्य वाचवावे लागेल. प्रत्येक तीन पोत्या पैकी एक पोते उंदीर खातात. म्हणूनच नागपंचमीचे आधुनिक व्रत धामण पाळा नी धान्योत्पादन वाढवा अशा उद्घोषणा बरोबरच ते कृतीतूनही व्हायला हवे. तरारून आलेल्या शेताकडे पाहून कृषी कन्यांना खूप आनंद होतो. मग त्या भविष्याची सुख– स्वप्ने पाहात उंच उंच झोके घेतात व हा सण साजरा करतात. या काळात मुलांनी मैदानी खेळ खेळावे, अशी जुनी प्रथाआहे. त्यासाठी मैदानी खेळांच्या स्पर्धा भरविण्याचा संकल्प श्रावणात धरावा व चातुर्मासात पूर्ण करावा. नागपंथाचा इतिहास आणि त्यासंबंधी विविध कलांची माहिती घेणे.

नागपंचमी हा श्रावण महिन्यातील अत्यंत महत्वाचा सण आहे. यादिवशी घरोघरी नागाची पूजा करून नागाला प्रसन्न करण्याची परंपरा आहे. नागाच्या मंदिरावर रोषनाई केली जाते, रात्रीपासुन पुजा–अर्चना केली जाते तर कुणाच्या मनसुबेचे निवारण केले जाते. मध्यप्रदेशातील पचमढी येथे नागद्वारला भव्य अशी यात्रा भरवली जाते, ती पाहण्याजोगी असते. त्यादिवशी उपासक बाहेरचं साधं पाणी सुध्दा पीत नाही. उपवास सोडते वेळी कढई केली जाते, जी सर्वांना निमंत्रीतांना दिल्यानंतर उपवास सोडला जातो.

इतका जटील उपवास असतो, जो ज्याला जमतो त्यालाच जमतो. सर्वसाधारण माणसं करुच शकत नाही, काटेकोरपणे पालन केले जाते. कालिया नागाचा पराभव करून यमुना नदीच्या पात्रातून भगवान श्रीकृष्ण सुरक्षित वर आले तो दिवस श्रावण शुद्ध पंचमीचा होता. त्यादिवसा पासून नागपूजा प्रचारात आली असे मानले जाते, पण ते वास्तव नाही. दर बारावर्षांनी नागपंचमीच्या दिवशी देशभरातील नाथसंप्रदायाच्या लोकांनी ही प्रथा प्रचलित करून गंगा–गौतमी (अहिल्या–गौतमी) संगमावर स्नान करण्यासाठी भाग पाडतात.

प्राचीन ग्रीक आणि रोमन संस्कृतीत नाग नृत्याचा प्रचार असलेला दिसून येतो. या नृत्याचा संबंध सर्जनशक्तीशी मानला जातो. नागाचा आणि पृथ्वीचा एकमेकांशी असलेला पवित्र संबंध या संस्कृतींनी मान्य केला आहे.

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी :** ९९२३६२०९१९
**ई-मेल :** pravinbagdegmail.com

# ऑगस्ट क्रांती दिन

आज ९ ऑगस्ट, संपूर्ण देशात आजचा दिवस ऑगस्ट क्रांती दिन म्हणून साजरा केला जातो. इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला मुक्त करण्यासाठी ज्यांनी प्राणाची आहुती दिली त्या हुतात्म्यांचा स्मरण करण्याचा दिवस म्हणजे ९ ऑगस्ट अर्थात क्रांती दिन ! स्वातंत्र्यलढ्याची मशाल पेटवत देशातून इंग्रज राजवटीला नेस्तनाबूत करण्याची हाक देणाऱ्या तमाम ज्ञात अज्ञात क्रांतिवीरांना अभिवादन करण्याचा हा दिवस. इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य करण्याचा दिलेला शब्द न पाळल्यामुळे या आंदोलनाची सुरुवात झाली. ८ ऑगस्ट १९४२ रोजी भारताला स्वातंत्र्य देणार असल्याची घोषणा इंग्रज सरकारने केली होती मात्र ऐनवेळी भारताला स्वातंत्र्य देणार नसल्याचे इंग्रजांनी सांगितले. त्यामुळे महात्मा गांधींनी देशभर ऑगस्ट क्रांती आंदोलनाची घोषणा केली. या आंदोलनाला चले जाओ आंदोलन असेही नाव देण्यात आले. करो या मरो अशी घोषणा या आंदोलनात करण्यात आली. दीडशे वर्षे भारतावर राज्य करणाऱ्या इंग्रजांना देशातून हुसकावून लावण्यासाठी ९ ऑगस्ट १९४२ रोजी क्रांतीची ठिणगी पडली होती. ९ ऑगस्ट रोजी महात्मा गांधींसह अनेक ज्येष्ठ नेत्यांना इंग्रजांनी अटक केली होती त्यामुळे संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्ध संतापाची लाट पसरली होती. महात्मा गांधींच्या झालेल्या अटकेला विरोध करण्यासाठी संपूर्ण देश एकवटला होता. इंग्रजांनी नेत्यांची धरपकड केल्याने आंदोलन लोकांच्या ताब्यात गेले. देशभर जागोजागी हरताळ, मिरवणुका, मोर्चे यांना ऊत आला. सरकारने लोकांना एकत्र येण्यास बंदी घातली पण लोक सरकारचे आदेश मानायला तयार नव्हते. आंदोलक पोलिसांच्या लाठीहल्ल्याला, गोळीबाराला जुमानत नव्हते. जाळपोळ, पोलिसांचे खून, टेलिफोन व तारा कापणे असे प्रकार सुरू झाले.

जणू लोकांनी ब्रिटिश सत्तेविरूद्ध युद्ध पुकारले होते. संपूर्ण देश पेटला होता. दंगल, जाळपोळ, गोळीबार, रेल्वेचे अपघात, सरकारी कार्यालयांना आगी लावणे, सरकारी खजिन्यांची लुटालूट असे प्रकार सुरू होते. इंग्रजांच्या दडपशाही विरुद्ध संपूर्ण देश एकवटला होता. देशवसियांच्या एकजुटीने इंग्रजांना गुडघे टेकायला लावले होते. दुसऱ्या महायुद्धाने खिळखिळ्या झालेल्या ब्रिटिश सरकारची या आंदोलनामुळे उरली सुरली ताकदही लोप पावत चालली होती. त्यानंतर देशवासीयांनी इंग्रजांना भारतातून हाकलून लावे पर्यंत हे आंदोलन सुरूच ठेवले. भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्य मिळाल्यापासून या आंदोलनात बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना श्रद्धांजली म्हणून हा दिवस ऑगस्ट क्रांती दिन म्हणून साजरा केला जातो. मुंबईतील ज्या मैदानावर तिरंगा फडकावून या आंदोलनाची सुरुवत करण्यात आली त्या मैदानाला क्रांती मैदान असे नाव देण्यात आले आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात १८५७ नंतरचा हा सर्वात मोठा स्वातंत्र्य लढा होता म्हणूनच या लढ्याला भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात खूप महत्वाचे स्थान आहे.

**श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे,९९२२५४६२९५**

# मनरेगा अंतर्गत गायरान जमिनीवर चारा लागवड मोहीम राबविण्यासाठी प्रयत्न करावेत - ॲड. निलेश हेलोंडे पाटील

**लातूर, (जिमाका) : महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतून गायरान आणि वैयक्तिक जमिनीवर चारा लागवड करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेतून जिल्ह्यातील गायरान जमिनींवर जनावरांसाठी चारा लागवड मोहीम राबविण्यासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचना कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत दिल्या.**




जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, रोहयो उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, आरोग्य उपसंचालक डॉ. अर्चना भोसले, शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी रमेश जाधव, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. नानासाहेब कदम, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी अमित भामरे, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार, स्वयंरोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त बालाजी मरे, जनसंपर्क अधिकारी महेंद्र गायकवाड यावेळी उपस्थित होते.

गायरान जमिनीवर चारा लागवड केल्यास अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर यांच्या जनावरांना चारा उपलब्ध होईल. त्यामुळे त्यांना दुग्ध व्यवसाय जोडधंदा म्हणून करणे शक्य होईल आणि त्यांना उत्पन्नाचा अतिरिक्त स्त्रोत निर्माण होईल. गायरान जमिनीवर चारा लागवड करताना संबंधित ग्रामपंचायतीला सहभागी करून घेतल्यास चारा लागवडीचे नियोजन व्यवस्थितपणे होवू शकेल. गायरान जमिनीवर चारा लागवड करताना कृषि विभागाने जमिनीची प्रतवारी तपासून कोणत्या प्रकारच्या चाऱ्याची लागवड करावी, याबाबत माहिती द्यावी, असे ॲड. हेलोंडे पाटील यांनी सांगितले.

लातूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सोयाबीनची लागवड होत असल्याने त्यावरील कीडरोग नियंत्रणासाठी आवश्यक जैविक खतांच्या निर्मितीबाबत शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे. यासाठी कृषि विभागाने शेतकऱ्यांच्या बांधावर शेतीशाळेचे आयोजन करून त्यांना जैविक खते बनविण्याबाबत मार्गदर्शन करावे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात बचत होवून कमी खर्चात कीड रोगांचे नियंत्रण करणे शक्य होईल, असे ॲड. हेलोंडे पाटील यावेळी म्हणाले. तसेच प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविणाऱ्या विमा कंपनीच्या प्रतिनिधींची नावे आणि संपर्क क्रमांक सर्व ग्रामपंचायतीमध्ये प्रसिद्ध कराव्यात. जेणेकरून शेतकऱ्यांना पीक नुकसानीची माहिती त्वरित देणे शक्य होईल, असे ते म्हणाले.

ग्रामीण भागातील नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा देण्यासाठी आरोग्य विभागाने आरोग्य शिबिरांचे आयोजन करून नागरिकांची आरोग्य तपासणी करावी. तसेच शिक्षण विभागानेही ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विविध संस्थांच्या सहकार्याने वह्या, पुस्तके, स्पर्धा परीक्षेसाठी आवश्यक पुस्तके देण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.

लातूर जिल्ह्यात गतवर्षी जिल्हा वार्षिक योजनेतून पशुसंवर्धन विभागाला चारा लागवडीसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. यामधून पशुपालक शेतकऱ्यांना चारा लागवडीसाठी बियाणे उपलब्ध करून देण्यात आले. त्यामुळे उन्हाळ्यात हा चारा पशुपालकांना उपलब्ध होवू शकला, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांनी सांगितले.

कृषि विभाग, पशुसंवर्धन विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा यावेळी आढावा घेण्यात आला.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेमुळे युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत - जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर, (जिमाका) : मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतून राज्यातील शिक्षित युवकांना प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. या प्रशिक्षणामुळे युवकांची नोकरी मिळण्याची क्षमता वाढण्यास मदत होणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर– घुगे यांनी आज येथे केले.




जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होत्या. प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगिता टकले, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, कौशल्य विकास सहायक आयुक्त बालाजी मरे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी जावेद शेख, नगरपालिका प्रशासनाचे जिल्हा सह आयुक्त रामदास कोकरे, समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अंतर्गत युवकांना उद्योजक, खासगी क्षेत्रातील आस्थापना, सेवा क्षेत्र, केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय तथा निमशासकीय आस्थापनांमध्ये काम करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. याठिकाणी प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळाल्यामुळे युवकांमध्ये नोकरी मिळविण्यासाठी आवश्यक क्षमता निर्माण होईल. या प्रशिक्षणाचा कालावधी सहा महिन्यांचा असून प्रशिक्षण काळात इयत्ता बारावी पास प्रशिक्षणार्थींना ६ हजार रुपये, आयटीआय, पदविकाधारक प्रशिक्षणार्थींना ८ हजार रुपये आणि पदवीधर, पदव्युत्तर प्रशिक्षणार्थींना १० हजार रुपये प्रतिमाह विद्यावेतन मिळणार आहे. त्यामुळे लातूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांनी या योजनेसाठी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांनी केले.

**मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेमुळे उद्योजकांना मिळणार मनुष्यबळ**

युवकांना प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण मिळावे, यासाठी सुरु करण्यात आलेल्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतून उद्योजक, खासगी क्षेत्रातील आस्थापना, सेवा क्षेत्र यांनाही सहभागी होता येणार आहे. खासगी आस्थापना, उद्योग यांना या योजनेतून त्यांच्याकडील एकूण कार्यरत पदांच्या २० टक्के प्रशिक्षणार्थी घेता येतील. या प्रशिक्षणार्थींना मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतून राज्य शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार, स्वयंरोजगार व उद्योजकता विभागामार्फत विद्यावेतन प्रशिक्षणार्थीच्या थेट बँक खात्यात (डीबीटी) ऑनलाईन पद्धतीने दरमहा अदा करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे म्हणाल्या.

लघु आणि मध्यम व मोठे उद्योग, शासकीय, निमशासकीय आस्थापना, महामंडळ आणि विविध आस्थापना यांनी आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची मागणी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने नोंदवावी. अधिक माहितीसाठी लातूर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या ०२३८२–२९९४६२ दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त बालाजी मरे यांनी यावेळी केले.

## महसूल पंधरवडा अंतर्गत १० ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे 'सैनिक हो तुमच्यासाठी' उपक्रम

लातूर, (जिमाका) : महसूल विभागामार्फत राज्यात १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट२०२४ दरम्यान महसूल पंधरवाडा साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गत १० ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे 'सैनिक हो तुमच्यासाठी' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. जिल्ह्यातील माजी सैनिक, विधवा व त्यांच्या अवलंबितांच्या महसूल विभागाशी संबंधित अडीअडचणी सोडविण्यात येणार आहेत. तरी ज्यांची तक्रार असेल, त्यांनी अर्ज व संबंधित कागदपत्रासह या बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले आहे.

## प्रायोजकांना जाहिरातींचे अधिकार देऊन होणार शहराचे सुशोभीकरण

* प्रवेशद्वार, चौक, रस्ता दुभाजक, बसथांबे, उड्डाणपुलाखालील मोकळी जागा, म.न.पा. शाळा,दवाखाने, कारंजे यांचे रुप बदलणार

* ऋमनपा बांधकाम विभागाचा महत्वाकांक्षी उपक्रम

लातूर/प्रतिनिधी: लातूर महानगरपालिका हद्दीतील चौक, प्रवेशद्वार, परीसर, रस्ता दुभाजक, बस थांबे, उड्डाणपुलाखालील मोकळी जागा, म.न.पा. शाळा, दवाखाने, कारंजे व इतर म.न.पा. कार्यालये यांचे सुशोभीकरण करुन शहर सौंदर्यीकरण करण्याच्या सूचना मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी प्रशासनास दिले आहेत. त्यानुसार मनपाची आर्थिक परिस्थिती व उपलब्ध निधी विचारात घेता स्पोन्सॉर च्या माध्यमातून शहरातील प्रवेशद्वार, चौक, रस्ता दुभाजक, बसथांबे, उड्डाणपुलाखालील मोकळी जागा, म.न.पा. शाळा,दवाखाने, कारंजे यांची

दुरुस्ती, सुशोभिकरण, निगा व देखभाल करण्याचे नियोजन उपायुक्त(बांधकाम) डॉ पंजाब खानसोळे व शहर अभियंता विजय चव्हाण यांनी केले आहे. त्यानुसार शहरातील इचुक एजन्सी/व्यावसायिक / नागरिकाना प्रवेशद्वार, चौक, रस्ता दुभाजक, बसथांबे, उड्डाणपुलाखालील मोकळी जागा, म.न.पा. शाळा,दवाखाने, कारंजे यांची देखभाल दुरुती व सुशोभिकरण करण्याची व त्याच ठिकाणी स्वतः च्या व्यवसायाची जाहिरात करण्याची नामी संधी महापालिकेने उपलब्ध करुन दिली आहे. सदरील उपक्रमाअंतर्गत ३ वर्ष कालावधीसाठी जाहीरातीचे हक्क देऊन जागा विकसीत करण्याचा मत्ता जाहिर ई-लिलावद्वारे देण्यात येणार आहे. संकेतस्थळ ु.शर्रीलींळेप.सीं.ळप यावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. लिलावात सहभाग घेण्यासाठी रु. १०००/- माहिती पुस्तिका किंमत व रु. ५०००- बयाना रक्कम मा. आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर यांचे नावे भरणा केल्यास सहभाग घेता येणार आहे.

ई-लिलावात सहभाग घेणा-यांसाठी दि. १६/०८/२०२४ पर्यंत कागदपत्र ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने सादर करण्याची मुदत असून लिलावासाठी पात्र बोलीदारांना पात्र करण्याची मुदत १९/०८/२०२४ व २०/०८/२०२४ पर्यंत आहे. पात्र बोलीदारांना कामनिहाय दि. २१/०८/२०२४, २२/०८/२०२४, २३/०८/२०२४ व दि. २४/०८/२०२४ रोजी ई-लिलावामध्ये सहभाग घेता येणार आहे.तरी जास्तीत जास्त व्यावसायिक, संस्था यांनी यात सहभाग नोंदवावा असे आव्हान उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांनी केले आहे.

## (गुरु वचन)
## सर्वांप्रती समान भाव असावा

एक स्वामी शारीरिक प्रकृतीने खूपच कमजोर होते. परंतु दररोज गंगास्नानाशिवायही इतरही काम ते करायचे. नदीच्या काठावर त्यांना खूप अडचण येत असे यासाठी स्नानाच्यावेळी ते ब्राह्मणाची म दत घेत होते व नंतर परतताना कोणत्याही जातीच्या व्यक्तीच्या खांद्यावर हाथ ठेऊन वरती येत होते. **(पान ४ वर) ...**

# पोहरेगावात मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

लातूर/प्रतिनिधी : माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री लोकनेते आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून रेणापूर तालुक्यातील पोहरेगाव येथे आयोजित मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे लातूर ग्रामीण मतदारसंघाचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्या हस्ते गुरुवारी उद्घाटन करण्यात आले.




पोहरेगाव येथे १४ ऑगस्ट पर्यंत शिबिर सुरू राहणार असून याच्या उद्घाटन सोहळ्यास माजी आमदार त्र्यंबक भिसे, सर्जेराव मोरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच व्ही वडगावे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीधर पाठक, गटविकास अधिकारी सुमित जाधव, नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. कुलकर्णी, डॉ. भालचंद्र चाकूरकर, लालासाहेब चव्हाण, अनंतराव देशमुख, प्रमोद जाधव, अनुप शेळके, उमाकांत खलंग्रे, रमेश सूर्यवंशी, शेषराव हाके पाटील, उद्धव चेपट, तानाजी कांबळे, नागनाथ कराड, आशादुल्ला सय्यद, शिरीष यादव, सरपंच ज्योती मोरे, दत्तात्रय सरवदे, शालीवाहन सरवदे, विश्र्वनाथ कागले, प्रकाश सूर्यवंशी, प्रमोद कापसे आदीसह परिसरातील विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था अधिक मजबूत झाल्या पाहिजेत. आरोग्य केंद्रात सर्व सोयी सुविधा असाव्यात. तत्पर आणि घरपोच आरोग्यसेवांची एक साखळी तयार झाली पाहिजे. प्राथमिक आरोग्य केंद्र व गावागावात सर्व आरोग्य सोयी उपलब्ध करण्यासाठी नव्याने आराखडा तयार करण्याची गरज आहे. यासाठी नियमांत शिथीलता आणण्याची गरज आहे, यासाठीची व्यवस्था आपण येणाऱ्या काळात निर्माण करू, असे आ. धिरज देशमुख यांनी सांगितले.

लोकनेते विलासराव देशमुख साहेब मुख्यमंत्री असताना लातूरसारख्या ठिकाणी त्यांनी बॅरेजची शृंखला तयार केली. या भागाची भौगोलिक परिस्थिती, गरज लक्षात घेऊन नव्या योजनांची आखणी करून त्याची अंमलबजावणी केली. यात विकासाचा दृष्टीकोन आहे. हाच दृष्टीकोन घेऊन यापुढेही जनतेच्या खांद्याला खांदा लावून काम करू, असे आ. धिरज देशमुख यांनी यावेळी सांगितले.

# विधानसभा निवडणुकीत जनता उद्धव ठाकरेंना नाकारेल भाजपाचे ज्येष्ठ नेते रावसाहेब पाटील दानवे यांचा विश्र्वास

दिल्ली दौ-यामधील पत्रकार परिषदेमधून उद्धव ठाकरे, आम्ही जनतेच्या न्यायालयात जाऊन न्याय मागणार अशी वल्गना करत आहेत. मात्र हिंदुत्वाला तिलांजली, सरकारी योजनांमध्ये खोडा घालण्याचे प्रयत्न, २०१९ मध्ये जनादेशाचा केलेला अनादर यामुळे उबाठा सेनेला जनता नाकारल्याशिवाय राहणार नाही असा विश्र्वास भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी गुरुवारी व्यक्त केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, प्रदेश समन्वयक विश्र्वास पाठक, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन उपस्थित होते. बांगलादेशमध्ये हिंदूंच्या हत्या होत असताना निषेध करण्याएवढेही उबाठा सेनेचे हिंदुत्व जागृत नाही असा सणसणीत टोला त्यांनी लगावला.




श्री.रावसाहेब पाटील दानवे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार हे राज्याच्या भल्यासाठी, जनतेच्या हितासाठी दिल्लीला जातात तेव्हा, महाराष्ट्र दिल्लीच्या इशा-यावर चालू देणार नाही या शब्दांत उद्धव ठाकरे टीका करतात. मग हेच ठाकरे महाशय आता दिल्ली दौ-यावर का गेले ?...... मुख्यमंत्रीपदाची याचना करण्यासाठी कोणाच्या दारात गेले?....दिल्ली दौ-यामध्ये श्री. ठाकरे यांनी आपणच किती कार्यक्षम मुख्यमंत्री होतो हे दाखवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत विविध नेत्यांच्या भेटींदरम्यान मुख्यमंत्रीपदाची याचना करण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. महाविकास आघाडीतील एका सहकाऱ्याने त्यांच्या पुस्तकात तत्कालिन मुख्यमंत्री श्री. ठाकरे त्यांच्या संपूर्ण मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात केवळ एक दिवस मंत्रालयात गेले याची खंत वाटते असे मत व्यक्त केले होते. यावरूनच एक मुख्यमंत्री म्हणून श्री. ठाकरेंची कार्यक्षमता काय होती हे दिसून येते असा टोलाही त्यांनी लगावला

पत्रकार परिषदेमध्ये बांगलादेशबाबत बोलताना श्री. ठाकरे यांनी तारे तोडले, बांगलादेशसारखी स्थिती भारतात देखील उद्भवू शकते. अशी चिथावणीखोर भाषा, हिंदुत्वापासून कोसो दूर गेलेल्या उद्धव ठाकरे यांनी त्वरित थांबवावी असाही इशारा श्री. दानवे यांनी दिला. शिवसेना - भाजपा युतीच्या काळात निवडणुकीचे जागावाटप, रणनीती ह्या सगळ्याच्या चर्चा, बैठका प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे यांच्या उपस्थितीत मातोश्रीवर होत असत मात्र आता जागावाटपासाठी दिल्लीला राहुल गांधी आणि मल्लिकार्जून खर्गे यांच्या दारात जाण्याची पाळी तुमच्यावर आली आहे, असे टीकास्त्र ही त्यांनी सोडले.

# चन्नबसवेश्र्वर फार्मसी महाविद्यालयात अवयवदान जनजागृती

**लातूर : चन्नबसवेश्र्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाउन यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय अवयव दिनानिमित्त अवयवदान जनजागृती व्याख्यान व घोषवाक्य लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. अवयवादानाच्या महत्त्वाबाबत जनजागृती करण्यासाठी आणि अवयवदानाबद्दल असलेल्या गैरसमजांची जाणीव करून देण्यासाठी दरवर्षी ३ ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय अवयवदान दिन म्हणून साजरा केला जातो. या मागचं मुख्य उद्दीष्ट म्हणजे गरजू व्यक्तींना अवयवदान करून अधिक जीव वाचवण्यासाठी आणि इतरांना सुद्धा अवयव दान करण्यासाठी प्रोत्साहित करणे आणि शिक्षित करणे आहे.**

सदरील कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने झाली. अवयवदान जनजागृती कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व्याख्याते डॉ. व्यंकटेश जोशी, सहयोगी प्राध्यापक, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर उपस्थित होते. डॉ. जोशी यांनी सांगितले की, अवयवदान का व कशा प्रकारे करावे तसेच मूत्रपिंड, हृदय, स्वादुपिंड, डोळे आणि फुफ्फुसे यासारख्या अवयवांचे दान केल्याने दीर्घकालीन आजारांनी ग्रस्त लोकांचा जीव वाचू शकतो. राष्ट्रीय अवयवदान दिन निमित्ताने महाविद्यालयात घोषवाक्य लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात




आले होते. या घोषवाक्य स्पर्धेमध्ये बी. फार्मसी द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी पांचाळ सायली बालाजी प्रथम, बी. फार्मसी द्वितीय वर्षातील विद्यार्थी शेख नबीसाब हमीद द्वितीय, बी. फार्मसी द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी मोरे क्षितिजा उत्तम व बी. फार्मसी तृतीय वर्षातील विद्यार्थिनी सानिका बालासाहेब कदम तृतीय क्रमांक पटकावला. सदरील कार्यक्रमादरम्यान विजयी स्पर्धकांना पारितोषिक व प्रशस्तीपत्र मान्यवरांचे हस्ते देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तस्लिम शेख तर आभार प्रदर्शन मयुरी कलशेट्टी यांनी केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी, डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाउनचे ह्युमन डेव्हलपमेंट डायरेक्टर डॉ. अभिजीत मुगळीकर, अध्यक्ष श्री. चेतन पंढरीकर, सचिव श्री. गिरीश पेंसलवार, प्रकल्प अध्यक्ष श्री. येनेश शाह, क्लब लर्निंग फॅसिलेटर व संस्थेचे संचालक श्री. अनुप देवणीकर, डॉ. शिवराज नागोबा, डॉ. अनंत देशपांडे, डॉ. विवेक पंचभाई, डॉ. पद्मजा गिराम, डॉ. राम साखरे, प्रा. सुनिल हिंडोळे, प्रा. वर्षा गायकवाड, प्रा. सारिका झिंगाडे, प्रा. रिशा वाले, रा.से.यो. समन्वयक प्रा. महेश मानके, प्रा. अमोल नारागुडे, प्रा. भिमाशंकर हूचे, प्रा. बालाजी अजगुंडे, प्रा. श्रेयश सरनाईक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, रा.से.यो. स्वयंसेवक व विद्यार्थी उपस्थित होते.

# अंधश्रद्धा टाळा अन् विज्ञानवादी दृष्टिकोन बाळगा - डॉ.रामशेट्टी शेटकार

लातूर : सध्याचे युग हे विज्ञान-तंत्रज्ञानाचे युग असून विद्यार्थ्यांनी भारतरत्न डॉ.ए.पी. जे.अब्दुल कलाम,जयंत नारळीकर,सी. व्ही.रमण व रघुनाथ माशालकर अशा दिग्गज वैज्ञानिकांचा आदर्श घेऊन समाजोपयोगी संशोधन केले पाहिजे. कारण विज्ञान हे आपणाला मिळालेले अलौकिक वरदानच असून विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण प्रयोग व निष्कर्षावर भर दिला पाहिजे.मराठी साहित्यात विज्ञान साहित्याची वानवा असून विद्यार्थ्यांनी विज्ञानवादी कथा,कादंबरी,कविता अशा दर्जेदार साहित्याची निर्मिती केली पाहिजे.आज २१ व्या शतकातही अज्ञान,अंधश्रद्धा,बुवाबाजी,



जादूटोणा,मंत्रतंत्र,करणी,भानामती,भूतबाधा यामुळे बहुसंख्य लोकं बळी पडत आहेत, म्हणूनच याचे समाजातून समूळ उच्चाटन झाले पाहिजे.त्यामुळेच विद्यार्थ्यांनी समाजजीवनातील अंधश्रद्धा,वाईट रूढी,प्रथा,परंपरा बाजूला सारून समाजजीवनात विज्ञानवादी दृष्टिकोन वृद्धिंगत होण्यासाठी कृतीसह जनजागृती केली पाहिजे.अंधश्रद्धा टाळून,विज्ञानवादी दृष्टिकोन बाळगून गाव,समाज आणि राष्ट्राचा सर्वांगीण विकास केला पाहिजे,असे प्रतिपादन प्रा.डॉ.रामशेट्टी शेटकार यांनी केले.

येथील दि.०८ ऑगस्ट २०२४ रोजी वैज्ञानिक विल्यम बेटेसन यांची १६३ वी जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात मराठी विभाग प्रमुख डॉ.रामशेट्टी शेटकार आणि डॉ.कोमल गोमारे यांनी वैज्ञानिकांच्या प्रतिमेस वंदन करून केली.जैवतंत्रज्ञान विभागातील प्रा.श्र्वेता मदने यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली.

यावेळी जैवतंत्रज्ञान विभागातील बी.एस्सी. प्रथम वर्षातील श्रीमंगले विशाखा या विद्यार्थीनीने सांगितले की,०८ ऑगस्ट १८६१ रोजी जन्मलेले विल्यम बेटेसन हे एक इंग्लिश जीवशास्त्रज्ञ होते,जे आनुवंशिकतेच्या अभ्यासाचे वर्णन करण्यासाठी जनुकशास्त्र हा शब्द वापरणारे पहिले व्यक्ती होते आणि ग्रेगर मेंडेल यांनी १९०० मध्ये ह्यूगो डी व्हाईस आणि कार्ल कॉरेन्स यांच्या पुनर्शोधानंतर त्यांच्या विचारांची लोकप्रियता होते.त्यांचे १८९४ चे मटेरिअल्स फॉर द स्टडी ऑफ व्हेरिएशन हे पुस्तक आनुवंशिकतेच्या नवीन दृष्टिकोनाच्या सुरुवातीच्या सूत्रांपैकी एक होते.०८ फेब्रुवारी १९२६ रोजी या महान शास्त्रज्ञांची प्राणज्योत मावळली.याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच जैवतंत्रज्ञान विभागातील पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निलंगा मतदारसंघाचा मानसन्मान वाढविण्याचे काम केले आ. संभाजी पाटील निलंगेकर यांचा संवाद दौरा

निलंगा/प्रतिनिधी : गत २० वर्षापासून राजकीय क्षेत्रात



कार्यरत असताना प्रत्येक नागरिकाशी सुसंवाद साधत त्यांना आपल्या परिवाराचे सदस्य म्हणूनच मान दिलेला आहे. त्याच बरोबर निलंगा मतदारसंघाचा मान सन्मान वाढेल, असे कार्य केलेले असून या माध्यमातून मतदारसंघातील प्रत्येकाचा स्वाभिमान उंचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. आगामी काळातही मतदार संघाचा मानसन्मान वाढेल, असेच कार्य होईल. असा विश्र्वास देवून याकरिता मतदारसंघातील नागरिकांचा आशिर्वाद माझ्या पाठिशी असावा, असे आवाहन माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केले आहे.

निलंगा मतदारसंघाअंतर्गत वडगाव, दगडवाडी व निटूर येथे जिल्हा परिषद मतदारसंघ निहाय आयोजित केलेल्या संवाद बैठकीत आ. निलंगेकर बोलत होते. यावेळी जिल्हा सरचिटणीस संजय दोरवे, विधानसभा प्रभारी दगडू साळुंके, प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर, तालुकाध्यक्ष कुमोद लोभे, मंगेश पाटील, बाजार समितीचे सभापती बाळासाहेब देशमुख, उपसभापती लालासाहेब देशमुख, माजी जि. प. सदस्य व्यंकट धुमाळ, धोंडीराम बिराजदार, संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष शेषेराव ममाळे, अरविंद पाटील जाजनुरकर, उत्तम लासुणे, स्वानंद धुमाळ, धोंडिराम सांगवे, गोविंद चिलकुरे, ज्ञानेश्र्वर चेवले, पंकज रक्षाळे, संतोष शेटे, माधव पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती.

निलंगा भूमीने आपल्याला स्वाभिमान शिकविलेला असून या स्वाभिमानाला ठेच न पोहोचविता निलंगा मतदारसंघाचा मान आणि सन्मान वाढविण्याचे काम केले असल्याचे सांगून आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी मतदारसंघातील प्रत्येकांशी सुसंवाद साधून त्यांना आपल्या परिवाराचा सदस्य म्हणूनच सोबत घेतलेले आहे. निलंगा मतदारसंघाच्या विकासासाठी केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून सातत्याने कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असून या निधीचा वाटा मतदारसंघातील प्रत्येक गावाला पोहोचविण्याचे काम प्रामाणिकपणे केले असल्याचे सांगितले. मात्र, मधल्या काळात म्हणजेच महाविकास आघाडी सरकारच्या काळात निलंगा मतदारसंघावर जाणिवपूर्वक अन्याय करण्याचे काम सत्ताधाजयांनी केले होते. कारण की, जिल्ह्याच्या वर्चस्वासाठी त्यांना निलंगेकरांवर मात करायची आहे.मात्र, आपला स्वाभिमान कायम ठेवत त्यांना वेळोवेळी ठोस उत्तर देण्याचे काम मतदारसंघातील नागरिकांच्या आशिर्वादाने केले असल्याचेही यावेळी आ. निलंगेकर यांनी आवर्जुन सांगितले.

लोकसभा निवडणूकीत जातीपातीचे राजकारण करत विरोधकांनी दिशाभूल करण्याचे काम केले आहे, असा आरोप करून या राजकारणाला आणि विरोधकांच्या भूलथापांना आता मतदारसंघातील जनता बळी पडणार नाही, असा विश्र्वास आ. निलंगेकर यांनी व्यक्त केला. कारण की आता आगामी होणारी लढाई मतदारसंघाच्या मान-सन्मान व स्वाभिमानाची असून या लढाईत मतदारसंघातील प्रत्येक नागरिकांनी मान-सन्मानासाठी माझ्या पाठिशी खंबीरपणे उभे रहावे, असे आवाहन केले.

या बैठकींना जिल्हा परिषद मतदारसंघातील पक्ष पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. या बैठकीच्या माध्यमातून उपस्थितांनी आम्ही तुमच्या पाठिशी आहोत, असा विश्र्वासही आ. निलंगेकर यांना दिला आहे.

## बुद्धिबळ स्पर्धेत कॉक्सिट द्वितीय

लातूर, - नांदेडचे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा



विद्यापीठ व येथील जयक्रांती महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि.६) घेण्यात आलेल्या मअफ विभागीय बुद्धिबळ स्पर्धेत कॉक्सिट महाविद्यालयाच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक संस्थाध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील यांनी केले.

या संघात कृष्णकांत कुलकर्णी, अभय शिरसाट, अक्षय हजारे, प्रणव देवडे, प्रथमेश इंगोले, सौदागर यादव यंनी सहभाग घेतला होता.

या यशाबद्दल यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थाध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष एल. एम. पाटील, कॉक्सिटचे प्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे, तज्ज्ञ संचालक एन. डी. जगताप, उपप्राचार्य डॉ. व्ही. व्ही. भोसले, उपप्राचार्य डॉ. डी. आर. सोमवंशी, ट्रेनिंग व प्लेसमेंट प्रमुख प्रा. कैलास जाधव, क्रीडा संचालक प्रा. बी. बी. देवडे, प्रबंधक संतोष कांबळे, अधीक्षक प्रदीप कावळे, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

## अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील नवउद्योजकांसाठी मार्जिन मनी योजना

लातूर, (जिमाका) : सामाजिक न्या व विशेष सहाय्य विभागाच्या ८ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील नवउद्योजकांसाठी मार्जिन मनी योजना सुरु करण्यात आलेली आहे. या योजनेच्या मार्गदर्शक सूचना ९ डिसेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार शासन स्तरावर निश्र्चित करण्यात आल्या आहेत. हा शासन निर्णय शासनाच्या ु.ारहरीरिहींर.र्सीं.ळप या संकेतस्थळावर निरीक्षणासाठी उपलब्ध आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील नवउद्योजक इच्छुक लाभार्थ्यांनी लातूर समाज कल्याण सहाय्यक आयुक्त कार्यालयाकडे शासन निर्णयात नमूद करण्यात आलेल्या सर्व अटी व शर्तींची पूर्तता करुन ३० सप्टेंबर, २०२४ पूर्वी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, लातूर येथे प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त शिवकांत चिकुर्ते यांनी केले आहे.

